आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०२४

ठळक बातम्या

- भारतीय राज्यघटना हा फक्त ग्रंथ नसून जगण्याचा मार्ग असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं नागपूरातील संविधान सन्मान संमेलनात प्रतिपादन.

- भारताला सक्षम करण्यासाठी राज्यात महायुतीला विजयी करण्याचं उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचं वाशीम येथील प्रचार सभेत आवाहन.

- विधानसभा निवडणुकीसाठीचा राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध; मुख्यमंत्र्यांकडून महायुतीच्या १० वचनांची घोषणा.

- अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी.

**#####**

राहुल गांधी संविधान संमेलन

समाजातील सर्व शोषित घटकांना समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान तयार केलं. त्यामागे समाज सुधारक महापुरुषांच्या विचारांचा अंतर्भाव होता, असं प्रतिपादन लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज नागपुरातील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित संविधान सन्मान संमेलनात केलं.

***हिंदुस्तान ने जब आंबेडकर जी से कहा कि आंबेडकर जी आप इस संविधान को बनाए कोऑर्डिनेट कीजिए तो देश उनसे कह रहा था कि हम चाहते हैं कि इस संविधान में जो इस देश में करोड़ दलित है, जो उनका दर्द है, जो रोज उनको जिना पड़ता है, जो उनका दुख है ,वो दुख, वो आवाज इस कॉन्स्टिट्यूशन में गूंजनी चाहिए और वह काम आंबेडकरजी ने किया. यह सिर्फ किताब नहीं है. यह जीने का तरीका है ।***

आर एस एस आणि भाजप हे संविधानाला प्रत्यक्ष विरोध करत नसून 'विकास', 'प्रगती' ,'अर्थव्यवस्था' अशा शब्दांचा वापर करून छुप्या मार्गाने संविधान संपवत

असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी यावेळी केला. शासकीय संस्था अथवा खाजगी संस्थांच्या शीर्ष व्यवस्थापनामध्ये एकही दलित किंवा इतर मागासवर्गीय शोधून सापडत नाहीत असे सांगून जाती आधारित जनगणना हा लोकांचा आवाज असून तो संसदेपर्यंत पोहोचवणे हे माझं काम असल्याचं राहुल गांधी यांनी स्पष्ट केलं. असमानतेच मूळ हे जात असून जाती आधारित जनगणना होणे आणि आरक्षणाची **50** टक्के मर्यादा ओलांडणे गरजेचं आहे असं देखील त्यांनी शेवटी सांगितलं.

तत्पूर्वी राहुल गांधी यांनी आज दीक्षाभूमी इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला भेट देऊन अभिवादन केलं. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारआणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य उपस्थित होते.

दरम्यान सांगली इथं भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एका प्रचार सभेसाठी आले असताना त्यांनी राहुल गांधींवर टीका केली. राहुल गांधी हे भारत जोडो यात्रेपासून अति डाव्या संघटनांसोबत राहत असून देशातील संस्था आणि व्यवस्था यांवरील जनतेचा विश्वास उडवून टाकण्याचे षड्यंत्र रचत आहेत. राहुल गांधी हे लाल रंगाचे संविधान घेऊन का फिरतात असा सवाल त्यांनी केला. या आरोपाचे खंडन करताना नागपूर मध्ये लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पहिल्याच कार्यक्रमाने भारतीय जनता पक्ष घाबरला असून भाजप नेते राहुल गांधींवर खोटे नाटे आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. हिंदु धर्मात लाल रंग शुभ मानला जातो पण भाजपला तो ही अपवित्र वाटू लागला आहे, असं स्पष्टीकरण महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिलं

दरम्यान आज सायंकाळी राहुल गांधी यांच्या हस्ते विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा मुंबईतल्या वांद्रे कुर्ला संकुल इथं प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील. या सभेला ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

प्रचार/ दौरे + आदित्य नाथ -विदर्भ

छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रेरणा घेऊन एकजुट होऊन राष्ट्रविरोधी शक्तीच्या विरोधात लढा देण्याचं आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज वाशिम येथील जाहीर सभेत केलं . यावेळी भाजपचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष राजू पाटील तसेच वाशिम मंगरूळपिर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार श्याम खोडे यांच्या सह संत महंतांची उपस्थिती होती.

भारताला सक्षम करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार राज्यात येणे आवश्यक आहे असं प्रतिपादन करत महाविकास आघाडीवर त्यांनी चौफेर टीका केली. या वेळी त्यांनी वाशीम जिल्ह्यातील महायुतीच्या तिन्ही उमेदवारांना विजयी करून देशाच्या विकासात योगदान द्यावे असं आवाहन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी वाशीम जिल्ह्यातील मतदारांना केलं. त्याचप्रमाणे अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या मूर्तिजापूर मतदार संघात महायुतीचे उमेदवार हरीश पिंपळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेला देखील योगी आदित्यनाथ यांनी संबोधित केलं.

भंडारा जिल्ह्यातील तुमसर विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी- अजित पवार गटाचे उमेदवार राजू कारेमोरे यांनी आज प्रचाराचा नारळ फोडला. गेली पाच वर्षे जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.सतत पाच वर्षे जनतेशी नाळ जुळली होती. त्यामुळे यंदा सुद्धा जनता आपल्याला निवडणूक देईल असा विश्वास राजू कारेमोरे यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान उत्तर नागपूर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉक्टर नितीन राऊत उद्या प्रचारार्थ पदयात्रेला प्रारंभ करणार आहेत. सकाळी साडेसात वाजता कोराडी नाका इथून त्यांची पदयात्रा सुरुवात होईल तर पिवळी नदी भंते आनंद कौशल्य नगर इथं या पदयात्रेचा समारोप होणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कोल्हापूर इथल्या सभेत विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ केला. या सभेत त्यांनी महायुतीच्या १० वचनांची घोषणा केली. यात लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये, शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतकरी सन्मान

योजनेत १५ हजार रुपये, प्रत्येकाला अन्न आणि निवारा, वृद्ध पेन्शनधारकांना एकवीसशे रुपये, २५ लाख रोजगार निर्मिती तसंच अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपये वेतन, वीज बिलात ३० टक्के कपात अशा वचनांचा समावेश आहे. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार : जाहीरनामा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मासिक रकमेत ६०० रुपयांची वाढ करून पात्र महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसनं आपल्या जाहीरनाम्यात दिलं आहे. विधानसभा निवडणुकीसाठीचा राज्यव्यापी जाहीरनामा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज मुंबईत प्रसिद्ध केला. तसंच या निवडणुकीत पक्ष लढवत असलेल्या मतदारसंघांपैकी ५० मतदारसंघांचे स्वतंत्र जाहीरनाम्यांच्या सारांश पुस्तिकेचं प्रकाशनही त्यांनी केलं. आपापल्या मतदारसंघांचा जाहीरनामा जाणून घेण्यासाठी टोल-फ्री क्रमांकही तटकरे यांनी जाहीर केला.

अजित पवार यांनी बारामतीतून या मतदारसंघासाठीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. बारामतीला देशातलं सर्वात आदर्श आणि प्रगत तालुका बनवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

मोदी दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शनिवार दिनांक ९ तारखेला नांदेड इथं जाहीर सभा होणार आहे. खासदार अशोक चव्हाण तसंच खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यातल्या महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा होणार असल्याचं चव्हाण यांनी सांगितलं. तत्पुर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी अकोला इथं सभा घेणार आहेत.

निवडणूक तयारी

निवडणूक प्रक्रिया राबवितांना त्यात कोणत्याही शंकेला वाव असता कामा नये याची खबरदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावी आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांनी आज निवडणूक यंत्रणांना दिले. छत्रपती संभाजीनगर यथील स्मार्ट सिटी

कार्यालयात छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठक आज पार पडली. दरम्यान अमरावती विभागातील मतदान यंत्र, निवडणुकीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्रणा यासोबतच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत, अशी माहिती विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी दिली. या बैठकीला पाण्डेय यांनी दूरदृश्यप्रणालीव्दारे सहभाग घेतला होता.

मतदार जागृती

मतदारांच्या मनात आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी तसेच येत्या २० नोव्हेंबर रोजी नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येत घराबाहेर पडून, लोकशाहीच्या उत्सवात आपले भरीव योगदान द्यावे याकरीता स्वीप अंतर्गत, मनपाद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचा एक भाग म्हणून मनपाद्वारे वाहनांवर “आय विल वोट फॉर शुअर”चे स्टिकर लावण्यात येत आहे. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या शासकीय वाहनावर सुध्दा स्टिकर लावण्यात आले.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्वतः आपल्या वाहनावर “आय विल वोट फॉर शुअर”चे स्टिकर लावून उपक्रमाचा शुभारंभ केला.

ट्रम्प विजयी

अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी झाले आहेत. राष्ट्राध्यक्षपदासाठी आवश्यक असलेली ५३८ पैकी २७० इलेक्टोरल मतं मिळवण्यात ते यशस्वी ठरले. रिपब्लिकन **J D** वान्स हे उपाध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. फॉक्स न्यूजनं दिलेल्या वृत्तानुसार ट्रम्प यांना २७७ तर डेमोक्रेटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांना २२६ इलेक्टोरल मतं मिळाली आहेत. अजून ३५ मतांची मोजणी शिल्लक आहे. एकूण ३१५ मतं मिळवू असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे.

ट्रम्प  यापूर्वी २०१६ ते २०२० मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यानंतर २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत ज्यो बायडेन यांनी त्यांना पराभूत केलं होतं. अमेरिकेचं सुवर्णयुग आता सुरू झालं असून पुन्हा अमेरिकेला महान करण्यासाठी हा विजय महत्वपूर्ण असल्याचं  ट्रम्प यांनी आपल्या समर्थकांना संबोधित करताना सांगितलं.

कांग्रेस प्रचार समिती

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचार समितीपदी ज्येष्ठ नेते आणि काँग्रेस वर्किंग कमिटी सदस्य, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे यांची नियुक्ती केली आहे. ४५ सदस्यांच्या या समितीच्या समन्वयकपदी प्रदेश उपाध्यक्ष संघटन आणि प्रशासन नाना गावंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**######**